# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 12/02/2024 (सोमवार) दुपार

---

## घरफोडी च्या गुन्हयातील आरोपी अटक
## नागपूर ग्रामीण पोलीसांची कारवाई

दि. ०१/०१/२०२ रोजी फिर्यादी नामे अनमोल शिखासन चव्हाण वय ३५ वर्ष रा. गहु हिवरारोड, पाणतावणे कॉलेज जवळ कन्हान हे त्याच्या घराला कुलुप राहुन नागपुर येथे गेले असता रात्री परत आले असता घराचे कुलंप तुटलेले असुन आलमारीचा लॉक तोडुन त्यातील सोण्याचे दागिणे असा एकुण ४,२२,४००/—रू मुदेमाल चोरीला केले असता फिर्यादीचा रिपोर्ट वरूण अज्ञात आरोपी विरूध्द गुन्हा नोंद करण्याल आला.

सदर गुन्हयाचा तपास दरम्याण आरोपी नामे (१) आकाश उर्फ दादु यशवंत गराडे वय २४ वर्ष रा. धरम नगर कन्हान (२) विक्की उर्फ विडो राजु बोरकर वय २५ वर्ष रा कामगार नगर कामठी यास दि. ०३/०२/२०२४ रोजी अटक करण्यात आली असता सदर आरोपी पि.सि.आर. दरम्याण त्याचा कडुन १) सोन्याचा हापसेट २) सोन्याचे टॉप्स ३) कानचैन ४) सुईधागा ५) जोड टॉप्स सोन्याची नथ ६) सोन्याचे टॉप्स, लॉकेट ७) सोन्याची चैन ८) सोन्याची अंगठी, सोन्याची अंगठी, सोन्याचे डोरले मनी असे सोन्याचे दागिणे एकुण ७५.७६० ग्रॅम किमंती व नगदी ८०,०००/—रू असा एकुण ४,२२,४००/—चा मुद्देमाल व गुन्हयात वापरलेली एक मोटर सायकल व मोबाईल आरोपीकडुन जप्त करण्यात आला.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक श्री. हर्ष पोद्दार (भा.पो.से), अपर पोलीस अधिक्षक श्री. रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनात उप विभागीय पोलीस अधिकारी पुंडलीक भटकर सा. कामठी विभाग कन्हान पो.नि. उमेश पाटील सा. पोस्टे कन्हान सपोनि राहुल चौव्हान सा, पोहवा मुदस्सर जमाल, हरिश सोनभद्रे, पोना॰ अमोल नागरे, महेश बिसने, पोशि॰आकाश सिरसाट, अश्विन गजभिये, यांनी केली आहे.

## लग्न समारंभात दागिने चोरी करणाऱ्या आरोपीस अटक
## नागपूर ग्रामीण पोलींसाची कारवाई

फिर्यादी उमेश गोविंदराव डाखोळे, वय ४० वर्ष, रा. प्रकाश नगर खापरखेडा हे दि. २०/११/२०२३ चे १६. ०० वा. दरम्यान दहेगाव रंगारी गजानन सभागृह हा त्यांच्या साळयाचे साक्षगंधकरीता आपले परीवारासह साक्षगंधाला गेले असता फिर्यादी व फिर्यादीची पत्नी स्टेजवर फोटो काढण्यासाठी गेले तेव्हा फिर्यादीच्या पत्नीने तिच्या जवळ असलेल्या सोन्याचांदीचे दागिने असलेले हॅडबॅग स्टेजच्या बाजूला खुर्चीवर ठेवून फोटो काढण्याकरीता गेली असता व फोटो काढुन परत आली असता फिर्यादीच्या पत्नीची खुर्चीवर ठेवलेली हॅडबॅग मध्ये असलेले सोन्याचांदीचे दागिने कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेल्याचे फिर्यादीचे तोंडी रीपोर्ट वरून पोस्टे खापरखेडा येथे अप क्र. अप क्र. ६९४/२३ कलम ३७९, ३४ गुन्हा नोंद केला होता.

सदर गुन्हयाचे तपासा दरम्यान सीसीटीव्ही फुटेज चेक केले असता, तांत्रिक माहितीद्वारे गोपनीय माहितीच्या आधारे सदर गुन्हयातील विधीसंघर्ष बालक व तिचा भाऊ हे दिनांक १०/०२/२०२४ रोजी ती महिला विधीसंघर्ष बालक व तिचा भाऊ आरोपी नामे– विशाल मुकेश सिसोदीया वय २५ वर्ष रा. ग्राम गुलखेडी जि. राजगढ म.प्र. हे सावनेर मधील मंगल कार्यालय येथे लग्न समारंभात चोरी करण्याचे उद्देशाने फिरत आहे. अशा माहितीवरून खापरखेडा पोलीसांनी सापळा रचुन त्यांना ताब्यात घेवुन सखोल विचारपुस केली असता चोरीची कबुली दिल्याने आरोपी नामे– विशाल मुकेश सिसोदीया वय २५ वर्ष रा. ग्राम गुलखेडी जि. राजगढ म.प्र. यांला दि. ११/०२/२०२४ रोजी अटक करण्यात आली. विधीसंघर्ष बालक यास बालगृह अमरावती येथे दाखल करण्यात आले.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक श्री. हर्ष पोद्दार (भा.पो.से), अपर पोलीस अधिक्षक श्री. रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक धनाजी जळक, पोहवा प्रफुल राठोड, शैलेश यादव, राजू भोयर, मुकेश वाघाडे, महिला पोहवा कविता गोंडाणे, पोलीस अंमलदार राजकुमार सातुर यांनी पार पाडली.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**